“मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजना”
हा अभिनव उपक्रम राबविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसआरव्ही-२०१६ /प्र.क्र.४३२/कार्यासन १२
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
तारीख : २० मार्च, २०१८

प्रस्तावना :-

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनी आपल्या कामाचा दर्जा सातत्याने उंचावत ठेवून बदलत्या काळानुसार गतिमान व कार्यक्षमपणे आपली कर्तव्ये पार पाडणे गरजेचे असते. सर्व शासकीय कर्मचाऱ्यांनी याची काळजी घेतल्यास राज्य शासन अधिक गतिमान व लोकाभिमुख होण्यास मदत होईल. अधिकारी व कर्मचाऱ्यांना आपली कर्तव्ये अधिक कार्यक्षमपणे व गतिमानतेने पार पाडण्यासाठी प्रवृत्त व प्रोत्साहित करण्याकरीता वस्तुनिष्ठ निकषांवर आधारित उत्कृष्ट अधिकारी/ कर्मचाऱ्यांचा गौरव करण्याची योजना सध्या अस्तित्वात नाही. प्रशासनामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना विशेष पुरस्काराने सन्मानित केल्यास त्याचा प्रभावी परिणाम सर्वच शासकीय अधिकारी /कर्मचारी यांच्यावर होऊन त्यांचेही कार्य उत्कृष्टपणे पार पाडण्यासाठी त्यांना प्रेरणा मिळेल. सबब, अधिकारी / कर्मचाऱ्यांना सक्षमपणे व पूर्ण कार्यक्षमतेने आपली कर्तव्ये पार पाडण्यासाठी प्रेरणा देऊन त्यांचे मनोधैर्य उंचाविण्यासाठी उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यासाठी नवीन पुरस्कार योजना अंमलात आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

उत्कृष्ट काम करणाऱ्या शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यासाठी “मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजना” ही अभिनव योजना सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षापासून सुरु करण्यास सदर शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

प्रथमत: मंत्रालय स्तरावर सन २०१८-२०१९ पासून व त्यानंतर क्षेत्रीय कार्यालय स्तरावर सन २०१९-२०२० पासून सदर योजना कार्यान्वित करण्यात येईल.

प्रतिवर्षी सदर पुरस्कार हा दि. २१ एप्रिल या नागरी सेवा दिनी प्रदान करण्यात येईल. मात्र सन २०१८-२०१९ या पहिल्या वर्षी पुरस्कार प्रदान करण्यासाठी उपलब्ध असलेला अल्प कालावधी विचारात घेता, हा पुरस्कार दि. १५ ऑगस्ट, २०१८ रोजी प्रदान करण्यात येईल.

मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजना खालीलप्रमाणे राबविण्यात येईल :-

१. “मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजनेची व्याप्ती” :-

मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजना महाराष्ट्र राज्यात सर्व राज्य शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी राबविण्यात येईल.

२. “मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजनेचे उद्दिष्ट ” :-

ही योजना सुरु करण्याचा मुख्य उद्देश हा मानांकने / निकषांवर आधारित शासकीय कामगिरीचे गुणाधारीत मूल्यमापन करुन याव्दारे उत्कृष्ट कामगिरी साध्य करणाऱ्या व त्यासाठी अंगभूत क्षमतांचा पूर्णपणे वापर करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांना सन्मानित करणे व त्याव्दारे इतर अधिकारी / कर्मचारी यांना कामकाजासाठी प्रोत्साहीत करणे.

३. "मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजनेचे थोडक्यात स्वरुप" :-

अधिकारी / कर्मचारी यांच्या कामाचा दर्जा उंचाविण्याच्या अनुषंगाने ही योजना गुणाधारीत स्वरुपात राबविण्यात येत आहे. यासाठी महाराष्ट्रातील सर्व संवर्गातील राज्य शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना दिलेले कामकाज व नियमाप्रमाणे अपेक्षित वर्तन या बाबी विचारात घेवून त्यानुषंगाने त्यांच्या कामकाजासंदर्भातील निकष ठरविले जातील. सदर निकषांनुसार त्यांचा वर्षभरातील कामगिरीचा आढावा घेवून गुणांकन केले जाईल.

सदर गुणांकन दोन प्रकारे करण्यात येईल.

- उद्दिष्टनिष्ठ बाबींसंदर्भातील (Ojective Items) कामगिरी, उदा. कार्यालयीन उपस्थिती, कामाचा निपटारा, वक्तशीरपणा, सचोटी, गोपनीय अहवालातील प्रतवारी, कार्यालयीन वर्तणूक वगैरे बाबींसाठी गुणांकन देण्यात येईल.
- व्यक्तिनिष्ठ बाबींसदर्भातील (Subjective Items) कामगिरी, उदा. संवाद कौशल्य, मसुदा कौशल्य, शासन नियमासंदर्भातील ज्ञानाची पातळी, नि:पक्षपातीपणा, निर्णय घेण्याची क्षमता, सादरीकरणाची क्षमता, नाविन्यपूर्ण कामकाजासंदर्भातील कल, लोकांशी सौजन्यपूर्ण वागणूक, वरिष्ठांना योग्य प्रकारे विषयाचे प्रस्तुतीकरण करण्याची क्षमता वगैरे बाबींसाठी गुणांकन देण्यात येईल.

उद्दिष्टनिष्ठ बाबींचे गुण हे कार्यालयीन अभिलेख्यांच्या आधारे निश्चित करता येतील. मात्र व्यक्तिनिष्ठ बाबींचे गुणांकन करण्यासाठी स्वतंत्र समिती गठीत करुन या समितीने सदर गुणांच्या तपासणीच्या अनुषंगाने तपासणीसूचीनुसार गुणांकन निश्चित करणे अपेक्षित आहे. तसेच संबंधित अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या बाबतीत दिलेल्या निकषांसंदर्भात त्यांचे वरिष्ठ, कनिष्ठ व त्यांचे त्याच संवर्गातील इतर सहयोगी यांचे मत जाणून घेवून त्याआधारे समितीने गुणांकन निश्चित करणे अपेक्षित आहे.

दोन्ही गुणांकन-उद्दिष्टनिष्ठ व व्यक्तीनिष्ठ यांची एकत्रित बेरीज करुन संबंधितांचे गुणांकन तीन स्तरावरील पुरस्कारासाठी (जिल्हा, मुख्यालय व विभागप्रमुख) अंतिम केले जाईल.

४. "मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार" योजनेंतर्गत पुरस्काराचे प्रकार :-

या योजनेंतर्गत खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे **तीन प्रकारचे पुरस्कार** प्रदान करण्यात येणार आहेत. त्याशिवाय मंत्रालय स्तरावर सर्वोत्कृष्ट प्रशासकीय विभाग हा पुरस्कार देखील प्रदान करण्यात येणार आहे.

मंत्रालय स्तर		**प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालय स्तर**		**पुरस्काराचे स्वरुप**
पुरस्काराचा स्तर	**पुरस्काराचे नाव**	**पुरस्काराचा स्तर**	**पुरस्काराचे नाव**	
प्रशासकीय विभागांच्या स्तरावर	विभाग रत्न पुरस्कार	जिल्हा/ विभाग स्तर	जिल्हा/ विभाग रत्न पुरस्कार	• मानपत्र • वैचारिक साहित्य • गणवेशावर लावण्यासाठी चिन्ह (Badge)
मंत्रालय स्तरावर संवर्ग निहाय स्वतंत्र पुरस्कार	संवर्ग रत्न पुरस्कार	क्षेत्रीय कार्यालय /मुख्यालय स्तरावर संवर्गनिहाय स्वतंत्र पुरस्कार	मुख्यालय रत्न पुरस्कार	• मानपत्र • वैचारिक साहित्य • गणवेशावर लावण्यासाठी चिन्ह (Badge) • पुरस्कार्थी व त्याच्या जोडीदार पती/पत्नी यांच्यासाठी ब्लेझर व खादीची साडी

मंत्रालय स्तरावर सर्व संवर्गांचा एकत्रित विचार करुन एक पुरस्कार	मंत्रालय भूषण पुरस्कार	प्रशासकीय विभाग स्तरावर सर्व संवर्गांचा एकत्रित विचार करुन एक पुरस्कार	प्रशासकीय विभाग भूषण पुरस्कार	• मानपत्र • वैचारिक साहित्य • गणवेशावर लावण्यासाठी चिन्ह (Badge) • पुरस्कार्थी व त्याच्या जोडीदार पती/पत्नी यांच्यासाठी ब्लेझर व खादीची साडी • पुरस्काराची रक्कम रु. १ लाख
मंत्रालय स्तरावर	सर्वोत्कृष्ट प्रशासकीय विभाग पुरस्कार	लागू नाही		• फिरते चषक • मानपत्र

५. "मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार" योजनेंतर्गत पुरस्कार्थी निवडीचे निकष :-

गुणाधारीत निकषांच्या आधारे मागील आर्थिक वर्षातील कामगिरी तपासून गठीत समितीने दिलेल्या गुणांकनानुसार पुरस्कार्थीची निवड करण्यात येईल.

६. "मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार" योजनेंतर्गत पात्रतेचे निकष :-

१) राज्य शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे किमान ५ वर्षे शासकीय सेवा पूर्ण झाल्यानंतर संबंधित अधिकारी/कर्मचारी याचा सदर पुरस्कार योजनेसाठी विचार करण्यात येईल.

- शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत स्थायित्व प्रमाणपत्र व ५ वर्षांची नियमित सेवा पूर्ण होणे आवश्यक राहील.
- शासकीय अधिकाऱ्यांच्या बाबतीत परीविक्षाधीन कालावधी समाधानकाररीत्या पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र, स्थायित्व प्रमाणपत्र व ५ वर्षाची नियमित सेवा पूर्ण होणे आवश्यक राहील.

२) ज्या अधिकारी / कर्मचारी यांच्यावर विभागीय चौकशी/ न्यायालयीन चौकशी चालू आहे किंवा जे अधिकारी / कर्मचारी हे शिक्षा भोगत आहेत, अशा अधिकारी / कर्मचारी यांचा सदर कालावधीमध्ये पुरस्कार योजनेसाठी विचार करण्यात येऊ नये.

३) मंत्रालय भूषण व प्रशासकीय विभाग भूषण पुरस्काराने अधिकारी / कर्मचारी यांना, त्यांच्या संपूर्ण शासकीय सेवा कालावधीमध्ये कमाल तीन वेळा सन्मानित करता येईल.

४) विभागरत्न व संवर्गरत्न पुरस्कार तसेच जिल्हा / विभाग रत्न व क्षेत्रीय कार्यालय / मुख्यालय रत्न पुरस्काराने शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना शासकीय सेवा कालावधीमध्ये कितीही वेळा सन्मानित करता येईल.

७. मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजनेचा आर्थिक भार :-

(I) मंत्रालय स्तरावर या योजनेसाठी आर्थिक भार खालीलप्रमाणे असेल :-

१. विभाग रत्न पुरस्कार -

अ) पुरस्कार्थींची संख्या अंदाजित - ३२२

ब) पुरस्कारासाठी अपेक्षित खर्च - रू. २,५७,६००/-

(वैचारिक साहित्य व Badge साठी एकूण मिळून प्रत्येकी रु. ८०० प्रमाणे)

२. संवर्ग रत्न पुरस्कार -

अ) पुरस्कार्थींची संख्या - २४

(सह/उपसचिव-३, अवर सचिव -३,कक्ष अधिकारी-३,सहायक कक्ष अधिकारी-३, वरिष्ठ स्वीय सहायक/निवडश्रेणी लघुलेखक/उच्चश्रेणी लघुलेखक-३, निम्नश्रेणी लघुलेखक/लघुटंकलेखक-३, लिपिक टंकलेखक- ३, वाहनचालक/ शिपाई-३)

ब) पुरस्कारासाठी अपेक्षित खर्च - रू. २,६४,०००/-
(ब्लेझर व साडी, वैचारिक साहित्य व badge करिता एकूण मिळून प्रत्येकी रू.११,००० प्रमाणे)

३. मंत्रालय भूषण पुरस्कार -

अ) पुरस्कार्थींची संख्या -१

ब) पुरस्कारासाठी अपेक्षित खर्च - रोख रक्कम पारितोषिक रु. १,००,०००/- तसेच रु.११,०००/- (वैचारिक साहित्य व Badge साठी) मिळून एकूण खर्च रु.१,११,०००/-

४. कार्यक्रम आयोजन

नागरी सेवा दिनी वरील पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्याकरीता कार्यक्रम आयोजन खर्च रु.३,००,०००/-

अ.क्र. १ ते ४ मिळून मंत्रालय स्तरावरील पुरस्कारासाठी एकूण रु. ९,३२,६००/- इतका (म्हणजेच अंदाजे रु. ९.०० लाख) खर्च अपेक्षित आहे. **सबब, मंत्रालय स्तरावर मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार या योजनेच्या अंमलबजावणीसाठी अंदाजे वार्षिक रू. ९,००,०००/- (रू. नऊ लाख फक्त) इतका खर्च अपेक्षित आहे.**

II) प्रत्येक प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयांसाठी सदर योजनेंतर्गत पुढीलप्रमाणे खर्च अपेक्षित :-

१. **जिल्हा/विभाग रत्न पुरस्कार** :-

अ) पुरस्कार्थींची किमान संख्या - २७० (जिल्हा / विभाग रत्न अंतर्गत विभागातील प्रत्येक संवर्गातील मंजूर पदसंख्येपैकी कार्यरत पदसंख्येच्या ५ टक्के मर्यादेपर्यंत अधिकारी / कर्मचारी यांना पुरस्कार द्यावयाचा असल्याने, पुरस्कार्थींची संख्या विभागनिहाय विभिन्न असल्याने, **तथापि, ढोबळमानाने अंदाजे सर्व प्रशासकीय विभागातील गट-अ ते गट-ड मध्ये मिळून सरासरी ९ संवर्ग कार्यरत असल्याचे गृहीत धरल्यास प्रत्येक जिल्ह्यामध्ये ९ संवर्गातील किमान १ पुरस्कार्थी याप्रमाणे एकूण ९ पुरस्कार्थी निवडले जातील. त्यानुसार ३० जिल्ह्यांतील एकूण २७० पुरस्कार्थी पात्र ठरतील.)**

ब) पुरस्कारासाठी अपेक्षित खर्च - रू. २,१६,०००/-
पुरस्कार्थींना वैचारिक साहित्य व Badge देऊन सत्कार करण्यात येणार असून, त्यासाठी प्रती पुरस्कार्थी रु.८०० प्रमाणे खर्च अपेक्षित आहे. प्रती पुरस्कार्थी रुपये ८०० प्रमाणे पुरस्कार संख्या विचारात घेवून या प्रयोजनासाठीचा खर्च वित्त विभागाच्या मान्यतेने अर्थसंकल्पित करावा.

२. **मुख्यालय रत्न पुरस्कार** :-

अ) पुरस्कार्थींची किमान संख्या - २७ (प्रत्येक प्रशासकीय विभागाच्या ९ संवर्गातील प्रत्येक संवर्गनिहाय ३ पुरस्कार्थी याप्रमाणे) मात्र जिल्हा / विभागरत्न पुरस्कार्थींची संख्या १०० पेक्षा जास्त असल्यास प्रत्येक १०० जिल्हा / विभागरत्न पुरस्कार्थींमधून ३ मुख्यालय रत्न पुरस्कार्थींची संख्या निश्चित होणार असल्याने **कमाल पुरस्कार्थींची संख्या विभाग निहाय विभिन्न असणार आहे.**

ब) पुरस्कारासाठी अपेक्षित खर्च - रू. २,९७,०००/-
(ब्लेझर व साडी, वैचारिक साहित्य व badge करिता प्रत्येकी रू.११,०००/-प्रमाणे)
तसेच प्रत्येक प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील केवळ एकच मुख्यालय / क्षेत्रीय कार्यालय कार्यरत नसून वेगवेगळ्या विषयांसाठी वेगवेगळ्या स्वरुपाचे कामकाज करणारे अनेक क्षेत्रीय कार्यालये अस्तित्वात असल्याने प्रशासकीय विभागस्तरावर याबाबतची

एकूण रक्कम त्या त्या विभागास निश्चित करणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रत्येक विभागाने सदर प्रयोजनासाठीचा खर्च वित्त विभागाच्या मान्यतेने अर्थसंकल्पित करावा.

३. प्रशासकीय विभाग भूषण पुरस्कार :-

अ) पुरस्कार्थींची संख्या -१

ब) पुरस्कारासाठी अपेक्षित खर्च - रोख रक्कम पारितोषिक रु. १,००,०००/- तसेच रु.११,०००/- (ब्लेझर व साडी, वैचारिक साहित्य व Badge साठी) मिळून एकूण खर्च रु.१,११,०००/-

४. कार्यक्रम आयोजन :-

नागरी सेवा दिनी वरील पुरस्कार समारंभपूर्वक प्रदान करण्याकरीता कार्यक्रम आयोजन खर्च रु.३,००,०००/-

सबब, प्रत्येक प्रशासकीय विभाग/ उपविभाग स्तरावर या योजनेच्या अंमलबजावणीसाठी ढोबळमानाने वरीलप्रमाणे अ.क्र.१ ते ४ मिळून एकूण रु.९,२४,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार ४८ प्रशासकीय विभाग / उप विभाग मिळून पुरस्कार योजनेचा खर्च रू. ४,४३,५२,०००/- इतका अपेक्षित आहे. थोडक्यात योजनेच्या अंमलबजावणीसाठी रु. ५ कोटी इतक्या खर्चास मंत्रिमंडळाने तत्वत: मान्यता दिली आहे. सर्व विभागांनी पुरस्कार्थींची संख्या निश्चित करून त्याद्वारे योजनेचा प्रत्यक्ष खर्च वित्त विभागाच्या मान्यतेने निश्चित करावा.

८. "मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार" योजनेच्या अंमलबजावणीचे वेळापत्रक :-

सदर पुरस्कार दरवर्षी दिनांक २१ एप्रिल रोजी नागरी सेवा दिनी प्रदान करण्यात यावा. सदर दिनाचे औचित्य साधून हा पुरस्कार प्रदान करण्यासाठी पुरस्कार्थी निवड प्रक्रिया खालील वेळापत्रकानुसार अंमलात आणावी :-

अ. क्र.	पुरस्कार निवड प्रक्रिया टप्पा	पुरस्काराचा प्रकार	कालावधी
१	पहिल्या स्तरावरील पुरस्कारासाठी पुरस्कार्थींची निवड	मंत्रालय संवर्ग - विभाग रत्न क्षेत्रीय संवर्ग - जिल्हा /विभाग रत्न	प्रतिवर्षी जानेवारी महिन्यात
२	दुसऱ्या स्तरावरील पुरस्कारासाठी पुरस्कार्थींची निवड	मंत्रालय संवर्ग - संवर्ग रत्न क्षेत्रीय संवर्ग - क्षेत्रीय कार्यालय /मुख्यालय रत्न	प्रतिवर्षी फेब्रुवारी महिन्यात
३	तिसऱ्या स्तरावरील पुरस्कारासाठी पुरस्कार्थींची निवड	मंत्रालय संवर्ग - मंत्रालय भूषण क्षेत्रीय संवर्ग - प्रशासकीय विभाग भूषण	प्रतिवर्षी मार्च महिन्यात
४	पुरस्कार प्रदान सोहळा	मंत्रालय भूषण व प्रशासकीय विभाग भूषण पुरस्कार - मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या हस्ते प्रदान करण्यात येईल. मंत्रालय संवर्ग - विभाग रत्न व संवर्ग रत्न तसेच क्षेत्रीय संवर्ग - जिल्हा /विभाग रत्न व क्षेत्रीय कार्यालय /मुख्यालय रत्न पुरस्कार हे संबंधित प्रशासकीय विभागांच्या मा. मंत्री महोदय यांच्या हस्ते प्रदान करण्यात येईल.	प्रतिवर्षी दि. २१ एप्रिल रोजी

<u>टिप :-</u> १) प्रत्येक वर्षी केवळ एकच आर्थिक वर्षाचे निकष विचारात घेऊन गुणांकन निश्चित करावयाचे आहे.

२) प्रतिवर्षी २१ एप्रिल या नागरी सेवा दिनी पुरस्कार प्रदान करावयाचा असल्याने त्याआधीच्या आर्थिक वर्षी निवड समित्यांची बैठक होणे आवश्यक आहे. त्यामुळे निवड

समित्यांच्या बैठकीमध्ये पुरस्कारांसाठी निवडीचे निकष तपासतांना, निवड समितीच्या बैठकीच्या आधीच्या आर्थिक वर्षातील बाबींनुसार गुणांकन निश्चित करणे आवश्यक आहे.

३) सबब ही योजना सन २०१८-२०१९ पासून कार्यान्वित होत असल्याने सन २०१८-२०१९ चे पुरस्कार प्रदान करताना निवड समितीने सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षातील बाबींनुसार निकष विचारात घेऊन गुणांकन निश्चित करावे. तसेच २१ एप्रिल २०१९ मध्ये पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यासाठी निवड समित्यांची बैठक सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये संपन्न होणे आवश्यक आहे व सदर बैठकीच्या वेळी निवड समितीने सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातील बाबींनुसार निकष विचारात घेऊन गुणांकन निश्चित करावे.

९. "मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार" योजनेच्या अंमलबजावणीची सविस्तर माहिती :-

मंत्रालयीन संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी सदर योजनेची अंमलबजावणी सामान्य प्रशासन विभागामार्फत सोबत जोडलेल्या **परिशिष्ट - अ** नुसार तसेच प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयातील सर्व अधिकारी/ कर्मचारी यांच्यासाठी (बिगर मंत्रालयीन संवर्गासाठी) त्या-त्या प्रशासकीय विभागामार्फत सदर योजनेची अंमलबजावणी **परिशिष्ट - ब** नुसार करण्यात येईल.

१०. "मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार" योजनेच्या अंमलबजावणीसाठी अर्थसंकल्पीय तरतुद :-

या योजनेचा खर्च भागविण्यासाठी सामान्य प्रशासन विभागामार्फत नवीन लेखाशिर्ष उघडून त्याखाली आवश्यक ती तरतूद करण्यात येईल व सदर तरतूदीतून क्षेत्रीय कार्यालयांच्या पुरस्कार योजनेसाठीची रक्कम संबंधित प्रशासकीय विभागांना वितरीत करण्यात येईल.

११. "मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार" योजनेचे पुनर्विलोकन करणे :-

या योजनेची अंमलबजावणी करत असताना अंमलबजावणीदरम्यान उद्भवणाऱ्या अडचणींचे निराकरण करणे तसेच कालानुरूप योजनेमध्ये यथायोग्य बदल करणे त्याचप्रमाणे पुरस्काराच्या निवडीच्या निकषांमध्ये सुधारणा करणे याबाबतचे अधिकार मा. मुख्य सचिव यांना प्रदान करण्यात येत आहेत.

सदर नवीन योजना सुरु करण्यास मा.मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२१११३३१९७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Mukesh Khullar

Digitally signed by Mukesh Khullar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6481e097db98eaae8b0580130544ebced12d1340cea24fcd0132235fb0c544a8, cn=Mukesh Khullar
Date: 2018.03.23 14:59:39 +05'30'

(मुकेश खुल्लर)
अपर मुख्य सचिव (सेवा), महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई,

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, विधानभवन, मुंबई,
५. सर्व मा.संसद सदस्य, /मा. विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६. मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
८. सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना),
त्यांनी हे आदेश त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभागप्रमुख/ प्रादेशिक विभागप्रमुख/ कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणावे.
९. *प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१०.*प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
११.*प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१२.*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१३.*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा) मुंबई,
१४.*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद) मुंबई,
१५.*राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
१६.*सचिव, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई,
१७.*महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई.
१८.*महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, मुंबई,
१९.*महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर,
२०.*महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, नागपूर,
२१.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई (प्रसिध्दीकरिता ५ प्रती)
२२.ग्रंथपाल , महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई ४०० ०३२ (१० प्रती)
२३.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२४.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२५.मुख्य लेखापरीक्षक (निवासी लेखे), कोंकण भवन, नवी मुंबई,
२६.सर्व विभागीय आयुक्त
२७.सर्व जिल्हाधिकारी
२८.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२९.बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १ (५ प्रती)
३०.भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरॅक नं.१ योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरीमन पॉईंट, मुंबई २० (५ प्रती)
३१.भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस. व्ही.पटेल रोड, मुंबई ४ (५ प्रती)
३२.भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३ (५ प्रती)
३३.इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५ (५ प्रती)
३४.नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई २१ (५ प्रती)

३५. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८ (५ प्रती)

३६. महाराष्ट्र नवनिर्माण सेना, कृष्णकुंज, एम.बी.राऊत रोड, शिवाजी पार्क, दादर, मुंबई ४०० ०२८. (५ प्रती)

३७. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,

३८. निवड नस्ती.

(*-पत्राद्वारे)

*****

परिशिष्ट अ

मंत्रालयीन संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजनेची अंमलबजावणी खालीलप्रमाणे करण्यात येईल.

१. "**पुरस्काराचे प्रकार ":-** सदर योजनेंतर्गत खालील चार पुरस्कार प्रदान करण्यात येतील.

अ) **विभाग रत्न पुरस्कार**:- प्रशासकीय विभाग स्तरावर सहसचिव/उपसचिव हा संवर्ग वगळून ७ संवर्गासाठी स्वतंत्रपणे संवर्गनिहाय पुरस्कार देण्यात येतील.

ब) **संवर्ग रत्न पुरस्कार**:- विभागरत्न पुरस्कार प्राप्त प्रत्येक संवर्गातील पुरस्कार्थीमधून संवर्गनिहाय तीन उत्कृष्ट मान्यवरांना तसेच सहसचिव/उपसचिव या संवर्गातील तीन उत्कृष्ट मान्यवरांना हा पुरस्कार देण्यात येईल.

क) **मंत्रालय भूषण पुरस्कार** :- संवर्गरत्न पुरस्कार प्राप्त पुरस्कार्थीमधून एका उत्कृष्ट मान्यवरास हा पुरस्कार देण्यात येईल.

ड) **सर्वोत्कृष्ट विभाग पुरस्कार** :- सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांमधून एका विभागास हा पुरस्कार देण्यात येईल.

२. "**पुरस्कार योजनेचे स्वरुप व निवड करण्याची कार्यपध्दती ":-**

अ) **विभाग रत्न पुरस्कार**

- हा पुरस्कार मंत्रालयीन प्रशासकीय विभाग स्तरावर देण्यात येईल.
- या पुरस्कारासाठी प्रशासकीय विभागांची यादी **परिशिष्ट-१** येथे जोडली आहे.
- सदर पुरस्कारासाठी खालीलप्रमाणे ७ संवर्ग विहित करण्यात आले आहेत.
    - अवर सचिव
    - कक्ष अधिकारी
    - सहाय्यक कक्ष अधिकारी
    - वरिष्ठ स्वीय सहाय्यक/ निवडश्रेणी लघुलेखक/उच्चश्रेणी लघुलेखक
    - निम्नश्रेणी लघुलेखक/ लघुटंकलेखक
    - लिपिक टंकलेखक
    - वाहन चालक/ शिपाई
- उपरोक्त विहित प्रत्येक संवर्गातून, त्या संवर्गासाठी विभागनिहाय मंजूर पदसंख्येपैकी कार्यरत पदसंख्येच्या ५ % संख्येपर्यंत व्यक्तींची पुरस्कारासाठी निवड करण्यात यावी.
- मात्र प्रत्येक संवर्गाची पदसंख्या किमान २० इतकी असावी. ही पदसंख्या २० पेक्षा कमी असल्यास विभागस्तरावर दोन किंवा अधिक संवर्ग एकत्र करुन त्यांची पदसंख्या किमान २० इतकी झाल्यानंतर त्या एकत्रित संवर्गामधून सदर पुरस्कारासाठी मंजूर पदसंख्येपैकी कार्यरत पदसंख्येच्या ५ % इतक्या कमाल व्यक्तींची पुरस्कारासाठी निवड करण्यात यावी.
- विभाग रत्न पुरस्कारासाठी पुरस्कार्थींची निवड करण्यासाठी **परिशिष्ट-२** नुसार निकष व गुणांकन पध्दत निश्चित करण्यात आली आहे.
- विभागरत्न पुरस्कारासाठी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना परिशिष्ट-२ मध्ये नमूद केलेल्या गुणांकन तक्त्यानुसार खालीलप्रमाणे गुणांकन मिळणे आवश्यक आहे.

संवर्गाचे नाव	उद्दिष्ट बाबी		व्यक्तीनिष्ठ बाबी		एकूण गुणांकन	किमान आवश्यक एकूण गुण
	एकूण गुणांकन	किमान आवश्यक गुण	एकूण गुणांकन	किमान आवश्यक गुण		
१	२	३	४	५	६ (२+४)	७ (३+५)
अवर सचिव	६०	३५	४०	२५	१००	६०
कक्ष अधिकारी						
सहायक कक्ष अधिकारी						
वरिष्ठ स्वीय सहायक, निवड श्रेणी व उच्चश्रेणी लघु लेखक,	५५	३३	२०	१२	७५	४५
निम्नश्रेणी लघु लेखक व लघुटंकलेखक						
लिपिक-टंकलेखक	८०	४७	२०	१३	१००	६०
वाहनचालक	५५	३३	२०	१२	७५	४५
शिपाई	३८	२३	१२	७	५०	३०

- उद्‌दिष्ट बाबींसाठी गुणांकन देण्याची कार्यवाही विभागाच्या आस्थापना शाखेने करावी. मात्र व्यक्तीनिष्ठ बाबींसाठी गुणांकन देण्यासाठी विभागस्तरावर खालीलप्रमाणे एक समिती गठीत करण्यात येईल.
  १. विभागातील अनुभवी सह / उप सचिव
  २. विभागांतर्गतच्या सर्व उप विभागातील १ उप सचिव. **उदा.** महसूल व वन विभागांतर्गत महसूल उप विभाग, वन उप विभाग तसेच मदत व पुनर्वसन उप विभाग या तिन्ही उप विभागातील प्रत्येकी १ उप सचिव
  ३. ज्या संवर्गाचे गुणांकन ठरवावयाचे आहे त्या संवर्गाच्या वरिष्ठ स्तरावरील एक अधिकारी.
- सदर समितीने सोबत जोडलेल्या **परिशिष्ट : अ-३** मधील नमूद तपासणी सूचीनुसार संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्या कामकाजाची पाहणी करुन त्यांना व्यक्तीनिष्ठ गुणांकन देण्याची कार्यवाही करावी.
- विभागाच्या समितीमार्फत देण्यात आलेले व्यक्तीनिष्ठ गुण व आस्थापना शाखेमार्फत देण्यात आलेले उद्दिष्ट गुण यांची आस्थापना शाखेने बेरीज करुन संबंधितांचे एकूण गुणांकन निश्चित करावे.
- विभागातील अधिकारी / कर्मचारी यांना वरील तक्त्यात नमूद केल्यानुसार किमान उद्दिष्ट गुण व किमान व्यक्तीनिष्ठ गुण मिळणे आवश्यक आहे. त्यानंतरच त्याच्या एकूण किमान गुणांचा विचार करुन संबंधित व्यक्ती किमान निकषानुसार पुरस्कारासाठी पात्र ठरते किंवा नाही, हे पहावे.
- त्यानंतर गुणांकनानुसार पात्र अधिकारी / कर्मचारी यांच्यामधून विभाग रत्न म्हणून पुरस्कार्थीची निवड करण्यासाठी मंत्रालयीन विभाग स्तरावर पुढीलप्रमाणे निवड समिती गठीत करण्यात येईल:

१) विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव किंवा त्यांनी निर्देशित केलेले सहसचिव/उपसचिव - अध्यक्ष
२) विभागातील जेष्ठ सहसचिव/उपसचिव - सदस्य
३) अवर सचिव / कक्ष अधिकारी (आस्थापना) - सदस्य सचिव

➢ विभाग रत्न पुरस्काराचे स्वरुप

पुरस्कार्थींना खालील बाबींने सन्मानित करण्यात येईल .

- मानपत्र
- वैचारिक साहित्य
- गणवेशावर दर्शनी भागावर लावता येईल असे चिन्ह (Badge)

ब) संवर्ग रत्न पुरस्कार

➢ हा पुरस्कार मंत्रालय स्तरावर एकूण ८ संवर्गासाठी स्वतंत्ररित्या देण्यात येईल.

➢ प्रत्येक मंत्रालयीन प्रशासकीय विभागस्तरावर संवर्गनिहाय विभाग रत्न पुरस्कारासाठी निवडण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांमधून प्रत्येक संवर्गातील अतिउत्कृष्ट अशा तीन अधिकारी/ कर्मचाऱ्यांची मंत्रालय स्तरावरील संवर्गरत्न पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल. त्यासाठी विभागरत्न पुरस्कारप्राप्त अधिकारी/ कर्मचारी यांचे गुणांकन पत्र अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे पाठविण्यात यावे. त्यांच्यामार्फत सदर गुणांकन पत्र निवड समितीपुढे सादर करण्यात येईल.

➢ सहसचिव व उपसचिव संवर्गातील अधिकाऱ्यांना प्रशासकीय विभाग स्तरावरील पुरस्कार दिले जाणार नसल्यामुळे सहसचिव व उपसचिव म्हणून कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांपैकी मंत्रालयीन स्तरावर तीन अतिउत्कृष्ट अधिकाऱ्यांची संवर्ग रत्न पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल.

➢ सहसचिव व उपसचिव संवर्गातील अधिकाऱ्यांची पुरस्कारासाठी निवड करण्यासाठी परिशिष्ट : अ-२ नुसार निकष व गुणांकन पध्दत निश्चित करण्यात आली आहे.

➢ परिशिष्ट : अ-२ मध्ये नमूद केलेल्या गुणांकन तक्त्यानुसार खालीलप्रमाणे गुणांकन मिळणे आवश्यक आहे.

संवर्गाचे नाव	उद्दिष्ट बाबींसाठी एकूण गुण	उद्दिष्ट बाबींसाठी आवश्यक किमान गुण	व्यक्तीनिष्ठ बाबींसाठी एकूण गुण	व्यक्तीनिष्ठ बाबींसाठी आवश्यक किमान गुण	एकूण गुण	किमान आवश्यक एकूण गुण
१	२	३	४	५	६ (२+४)	७ (३+५)
सह सचिव/ उप सचिव	६०	३५	४०	२५	१००	६०

➢ सहसचिव व उपसचिव संवर्गातील अधिकाऱ्यांचे उद्दिष्ट बाबींसाठीचे गुणांकन संबंधित प्रशासकीय विभागामार्फत करण्यात येईल. मात्र व्यक्तीनिष्ठ बाबींचे गुणांकन संबंधित प्रशासकीय विभागाच्या अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव यांच्यामार्फत **परिशिष्ट : अ-३** मध्ये नमूद केलेल्या तपासणी सूचीनुसार करण्यात येईल.

➢ विभागाच्या आस्थापना शाखेने सह सचिव व उप सचिवांच्या व्यक्तीनिष्ठ गुण व उद्दिष्ट गुण यांची बेरीज करुन संबंधितांचे एकूण गुणांकन निश्चित करावे.

- सह सचिव व उप सचिव यांनी वरील तक्त्यात नमूद केल्यानुसार किमान उद्दिष्ट गुण व किमान व्यक्तीनिष्ठ गुण मिळणे आवश्यक आहे. त्यानंतरच त्याच्या एकूण किमान गुणांचा विचार करुन संबंधित व्यक्ती किमान निकषानुसार पुरस्कारासाठी पात्र ठरते किंवा नाही, हे पहावे.
  - त्यानंतर गुणांकनानुसार पात्र सह सचिव व उप सचिव यांची यादी विभागामार्फत सामान्य प्रशासन विभागास सादर करण्यात येईल.
  - विभाग रत्न पुरस्कारप्राप्त अधिकारी / कर्मचारी यांची यादी व गुणांकन पत्र तसेच गुणांकनानुसार संवर्ग रत्न पुरस्कारासाठी पात्र सह सचिव व उप सचिव यांची यादी व त्यांचे गुणांकन पत्र सामान्य प्रशासन विभागास सादर करण्यात येईल व सदर यादी खाली नमूद केलेल्या निवड समितीपुढे सादर करण्यात येईल.
  - संवर्ग रत्न पुरस्कारासाठी केवळ गुणांकन पत्राच्या आधारे अधिकारी / कर्मचारी यांची निवड करणे योग्य ठरणार नसल्याने सदर पुरस्कारासाठी गुणांकन पध्दती शिवाय संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे कार्यालयीन कामकाजाचा योग्य पध्दतीने व जलद गतीने तसेच पारदर्शकपणे निपटारा करण्यासाठी विभागातील वरिष्ठांशी, तसेच हाताखालील कर्मचाऱ्यांशी त्याचप्रमाणे क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांच्याशी कशाप्रकारची वागणूक आहे, याबाबतची माहिती घेऊन त्या आधारे पात्र व्यक्तींची निवड करण्यात येईल.
  - उपरोक्त नमूद माहिती मिळविण्यासाठी सामान्य प्रशासन विभागामार्फत एक गोपनीय समिती गठीत करण्यात येईल व सदर समितीमार्फत संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्याबाबतची माहिती सोबतच्या **परिशिष्ट : अ-४** नुसार विभागातील वरिष्ठ अधिकारी, विभागातील कर्मचारी तसेच क्षेत्रीय कार्यालयातील अधिकारी / कर्मचारी यांच्याकडून घेण्यात येऊन, त्यानुसार गुणांकन देण्यात येईल. यासाठी एकूण ५० गुणांपैकी किमान ३० गुण मिळणे आवश्यक आहे.
  - संवर्ग रत्न पुरस्कारासाठी संबधित विभागाकडून विभाग रत्न पुरस्कार प्राप्त अधिकारी व कर्मचारी यांचे गुणांकन तसेच संबंधितांचे सामान्य प्रशासन विभागामार्फत गठीत गोपनीय समितीचे गुणांकन यांचा एकत्रित विचार करण्यात येईल. पात्र सह सचिव व उप सचिव यांचे संबंधित विभागाकडून प्राप्त गुणांकन तसेच संबंधितांचे सामान्य प्रशासन विभागामार्फत गठीत गोपनीय समितीचे गुणांकन यांचा एकत्रित विचार करण्यात येईल.
  - संवर्ग रत्न पुरस्कारासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवड करण्याकरिता मंत्रालय स्तरावर खालीलप्रमाणे निवड समिती गठीत करण्यात येईल.
    - प्रधान सचिव/सचिव (र.व का.), सामान्य प्रशासन विभाग - अध्यक्ष
    - सह /उपसचिव (र. व का./का.१८), सामान्य प्रशासन विभाग - सदस्य
    - अपर मुख्य सचिव(सेवा) यांनी नामनिर्देशित केलेले मंत्रालयीन सहसचिव संवर्गातील अधिकारी - सदस्य
    - सह / उपसचिव (कार्या.१४), सामान्य प्रशासन विभाग - सदस्य-सचिव

- संवर्ग रत्न पुरस्काराचे स्वरुप

  पुरस्कार्थींना खालील बाबींने सन्मानित करण्यात येईल
  - मानपत्र
  - वैचारिक साहित्य
  - ब्लेझर व खादीची साडी (पुरस्कार्थी व त्यांच्या जोडीदार पती/पत्नी यांच्यासाठी)
  - गणवेशावर दर्शनी भागावर लावता येईल असे चिन्ह (Badge)

क) मंत्रालय भूषण पुरस्कार

- हा पुरस्कार मंत्रालय स्तरावर सर्व संवर्गांचा एकत्रित विचार करुन देण्यात येईल.
- संवर्ग रत्न पुरस्कार प्राप्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांमधून सर्व संवर्गांचा एकत्रित विचार करुन त्यापैकी सर्वोत्कृष्ट अशा एका अधिकारी/ कर्मचारी याची निवड मंत्रालय भूषण पुरस्कारासाठी करण्यात येईल.
- मंत्रालय भूषण पुरस्कारासाठी निवड झालेला अधिकारी किंवा कर्मचारी हा मंत्रालयीन विभागात कार्यरत असलेल्या कोणत्याही संवर्गातील असेल.
- मंत्रालय भूषण या पुरस्कारासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवड करण्यासाठी खालील प्रमाणे निवड समिती राहील.

१) मा. मुख्य सचिव	- अध्यक्ष
२) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग	- सदस्य
३) प्रधान सचिव/सचिव (र.व का.), सामान्य प्रशासन विभाग	- सदस्य
४) सह / उपसचिव (कार्या.१४), सामान्य प्रशासन विभाग	– सदस्य सचिव

- मंत्रालय भूषण पुरस्काराचे स्वरुप
  - पुरस्कारार्थीला रोख रक्कम रु.१,००,०००/- देऊन सन्मानित करणे
  - मानपत्र
  - वैचारिक साहित्य
  - ब्लेझर व खादीची साडी (पुरस्कारार्थी व त्यांच्या जोडीदार पती/पत्नी यांच्यासाठी)
  - गणवेशावर दर्शनी भागावर लावता येईल असे सन्मान चिन्ह (Badge)
  - मंत्रालय भूषण पुरस्कार प्राप्त अधिकारी/कर्मचाऱ्याचे नाव मंत्रालयीन इमारतीमध्ये दर्शनी भागातील सन्मान फलकावर (Scroll of Honour) कायमस्वरुपी प्रदर्शित करण्यात येईल

ड) सर्वोत्कृष्ट विभाग

- मंत्रालयीन प्रशासकीय विभागनिहाय यादी सोबतच्या **परिशिष्ट : अ-१** येथे जोडली आहे. सदर यादीमधील एका विभागाची सर्वोउत्कृष्ट विभाग म्हणून निवड करण्यात येईल.
- सर्वोत्कृष्ट विभागाची निवड करण्यासाठी **परिशिष्ट : अ-५** नुसार निकष व गुणांकन निश्चित करण्यात आले आहेत.
- निश्चित केलेल्या निकषांनुसार प्राप्त गुणांकनानुसार, सर्वोत्कृष्ट विभागाची निवड करण्याकरिता खालीलप्रमाणे निवड समिती गठीत करण्यात येईल.

१) मुख्य सचिव	- अध्यक्ष
२) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग	- सदस्य
२) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग	- सदस्य
३) प्रधान सचिव (र. व का.), सामान्य प्रशासन विभाग	- सदस्य
४) सह/ उपसचिव (कार्या.१४), सामान्य प्रशासन विभाग	- सदस्य सचिव

- सर्वोत्कृष्ट विभाग पुरस्काराचे स्वरुप

  सर्वोत्कृष्ट विभागास खालील पध्दतीने सन्मानित करण्यात येईल :-

  - फिरते चषक (रोलींग ट्रॉफी)
  - मानपत्र

शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही- २०१६ /प्र.क्र.४३२/२०१६/का.१२, दिनांक : २० मार्च, २०१८

परिशिष्ट : अ-१

मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजनेसाठी विभागनिहाय यादी

अ.क्र.	विभाग
१	सामान्य प्रशासन विभाग
२	गृह विभाग
३	महसूल व वन विभाग
४	कृषी व पुदम विभाग
५	शालेय शिक्षण व क्रिडा विभाग
६	नगर विकास विभाग
७	वित्त विभाग
८	सार्वजनिक बांधकाम विभाग
९	जलसंपदा विभाग
१०	विधि व न्याय विभाग
११	उद्योग , उर्जा व कामगार विभाग
१२	ग्रामविकास विभाग
१३	अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
१४	नियोजन विभाग
१५	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
१६	संसदीय कार्य विभाग
१७	गृहनिर्माण विभाग
१८	पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
१९	सार्वजनिक आरोग्य विभाग
२०	वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
२१	आदिवासी विकास विभाग
२२	पर्यावरण विभाग
२३	सहकार विभाग
२४	पणन व वस्त्रोद्योग विभाग
२५	उच्च व तंत्र शिक्षण विभाग
२६	महिला व बाल विकास विभाग
२७	कौशल्य विकास व उद्योजकता विभाग
२८	पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
२९	अल्पसंख्याक विकास विभाग
३०	मराठी भाषा विभाग
३१	विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग
३२	मृद व जलसंधारण विभाग

परिशिष्ट : अ-२

मुख्यमंत्री सुकर्मी पुरस्कार योजनेतंर्गत अधिकारी/कर्मचारी निवडीचे निकष

संवर्ग: सहसचिव/उपसचिव **एकूण गुण - १००**

अ.क्र.	Parameter/ निकष	Minimum Level /किमान स्तर	Marks/ गुण
	(अ) Objective Items /उद्दिष्टनिष्ठ बाबी		
१	Punctuality /वक्तशीरपणा		
	१. Punctuality regarding office working hours /कार्यालयीन वेळेनुसार येण्या-जाण्याबाबतचा वक्तशीरपणा	८५% ९०% ९५% १००%	१ २ ४ ५
	२.Leave trend (all types of leaves except C.L.) / रजेचा कल	२१ ते २५ दिवस १६ ते २० दिवस ११ ते १५ दिवस ६ ते १० दिवस १ ते ५ दिवस	१ २ ३ ४ ५
२	Disposal/ निपटारा		
	% of receipt cleared every month during the year/ वर्षामध्ये दरमहा निपटारा केलेल्या संदर्भाची टक्केवारी	८५% ९०% ९५% १००%	२ ४ ६ ८
	% of files disposed every month during year /वर्षामध्ये दरमहा निपटारा केलेल्या नस्तींची टक्केवारी	८५% ९०% ९५% १००%	२ ४ ६ ८
	% of RTI Appeal Cleared during the year / वर्षामध्ये निपटारा केलेले माहिती अधिकार अपिलांची टक्केवारी	५०% अपील निकाली काढले ७५% अपील निकाली काढले १००% अपील निकाली काढले	१ २ ३
	Compliance of KRA / विभागाच्या KRA मुद्दयांची पूर्तता करणे.	५०% KRA मुद्दयांची पूर्तता केली ७५% KRA मुद्दयांची पूर्तता केली १००%KRA मुद्दयांची पूर्तता केली	१ ३ ५
	% of receipt applications cleared recived on PG Portal, Government Grivencess and on govt. Website/ पी.जी.पोर्टल, आपले सरकार व इतर शासकीय वेबसाईटवरील प्राप्त संदर्भाच्या निपटाऱ्याची टक्केवारी	५०% अर्ज निकाली काढले ७५% अर्ज निकाली काढले १००% अर्ज निकाली काढले	१ २ ३
३.	Organization and Methodology/ रचना व कार्यपध्दती No of Inspections of each sections carried out in the year (Inspection Reports)/ वर्षामध्ये पर्यवेक्षणाखालील कार्यासनांचे केलेले निरीक्षण (निरीक्षण अहवाल)	३ २ १	३ २ १
४.	Capacity / क्षमता Has undergone all mandatory trainings (अनिवार्य प्रशिक्षण पूर्ण केले आहे काय	होय	३
	Skill in proper briefing about assembly matters, about meeting agenda to Hon. Minister and Secretary of Department /अधिवेशनाशी संबंधित बाबी तसेच बैठकीच्या	जुजबी माहिती देण्यात येते. अभ्यासपूर्वक योग्य माहिती देण्यात येते	२ ४

	विषया संदर्भात मा. मंत्री महोदय व विभागाच्या सचिवांना योग्य रितीने विषयाची माहिती सादर करण्याची शैली		
५.	Integrity/सचोटी		
	१. No misconduct in last financial year (मागील आर्थिक वर्षी कोणतेही गैरवर्तन केलेले नाही)	होय	३
	२. Filing of Property returns (मत्ता व दायित्वे विवरणपत्रे मुदतीत सादर केली)	होय	२
६.	Total Period Spent in the Cadre except deputation period/प्रतिनियुक्ती वरील कालावधी वगळून संवर्गामध्ये व्यतित केलेला कालावधी.	१००% ७५% ५०%	३ २ १
७.	Average gradation of Confidential Report of last five financial year/ गोपनीय अहवालाची मागील पाच आर्थिक वर्षाची सरासरी प्रतवारी	A+ A B+	५ ३ १
	(अ) Objective Items / उद्दिष्टनिष्ठ बाबींचे एकूण कमाल गुण		६०
	(ब) Subjective Items /व्यक्तीनिष्ठ बाबी		
१.	Knowledge/ ज्ञान		
	Application of Rules, Orders/ लागू नियम व शासन आदेशांचा वापर	होय	४
	Changes made in the existing Rules/ Orders (प्रचलित नियम /शासन आदेशामध्ये बदल केले)	होय	४
२.	Communication Skills (संवाद कौशल्ये)		
	Drafting (मसुदा कौशल्य)	होय	४
	Presentation (सादरीकरण)	होय	४
३.	Sincerity in work (प्रामाणिकपणा)		
	Decision oriented(निर्णय देणारे)	होय	४
	fairness/impartiality (नि:पक्षपातीपणा)	होय	४
४.	Innovation (नाविण्यपूर्ण)		
	Weeding out irrelevant processes/rules (अनावश्यक प्रक्रिया व नियम निरस्त करणे)	होय	४
	Use of ICT in day to day work i.e. use of e-office, online portals/दैनंदिन कामकाजामध्ये माहिती व तंत्रज्ञानाचा वापर	होय	४
५.	Extra Activities (इतर उपक्रम) Participation in Sports competitions, Participation in adventure activities, Performance in arts and culture, social activities, publication of literature /Research paper-thesis/ Article in well known news paper-magzine क्रिडा स्पर्धामध्ये सहभाग/धाडशी उपक्रमात सहभाग/कला-सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग/सामाजिक कार्य/ प्रकाशित साहित्य- संशोधनपर शोध निबंध/प्रबंध प्रकाशन/प्रसिध्द वर्तमानपत्र- नियतकालिकात छापलेले लेख इ.	सदर नमूद उपक्रमांपैकी एका उपक्रमात सहभागी झाले असल्यास एकपेक्षा जास्त उपक्रमात सहभागी झाले असल्यास	२ ४
६.	Collaboration within and outside the department (विभागातंर्गत व विभागाबाहेरील सहकार्य)	होय	४
	(ब) Subjective Items / व्यक्तीनिष्ठ बाबींचे एकूण कमाल गुण		४०
	उद्दिष्टनिष्ठ व व्यक्तीनिष्ठ बाबींचे मिळून (अ+ब) एकूण कमाल गुणांकन		१००

संवर्ग: अवर सचिव **एकूण गुण -१००**

अ.क्र.	Parameter/ निकष	Minimum Level /किमान स्तर	Marks/ गुण
	(अ) Objective Items /उद्दिष्टनिष्ठ बाबी		
१	Punctuality /वक्तशीरपणा		
	१. Punctuality regarding office working hours /कार्यालयीन वेळेनुसार येण्या-जाण्याबाबतचा वक्तशीरपणा	८५% ९०% ९५% १००%	१ २ ४ ५
	२.Leave trend (all types of leaves except C.L.) / रजेचा कल	२१ ते २५ दिवस १६ ते २० दिवस ११ ते १५ दिवस ६ ते १० दिवस १ ते ५ दिवस	१ २ ३ ४ ५
२	Disposal/ निपटारा		
	% of receipt cleared every month during the year/ वर्षामध्ये दरमहा निपटारा केलेल्या संदर्भाची टक्केवारी	८५% ९०% ९५% १००%	२ ४ ६ ८
	% of files disposed every month during year /वर्षामध्ये दरमहा निपटारा केलेल्या नस्तींची टक्केवारी	८५% ९०% ९५% १००%	२ ४ ६ ८
	Audit paras cleared during the year, Court Matters cleared during the year, Policy decision taken during the year/ वर्षामध्ये निपटारा केलेले लेखापरीक्षण परिच्छेद, वर्षाभरात निपटारा केलेली न्यायालयीन प्रकरणे, वर्षाभरात घेतलेले महत्वाचे शासन निर्णय	८५% ९० % ९५% १००%	२ ४ ६ ८
	percentage of RTI appeals against PIO / जनमाहिती अधिकारी यांच्याविरुध्द माहिती अधिकारांतर्गत होणारे अपील	कोणतेही अपील नाही २०% प्रकरणांत अपील ५०% प्रकरणांत अपील	३ २ १
	No. of legislative matters dealt during year such as Starred/Unstarred question, assurances,calling attention and other /(वर्षामध्ये विधानमंडळ विषयक प्रस्ताव/प्रश्न/आश्वासने/ लक्षवेधी व इतर)	१०० पेक्षा जास्त ७५ -१०० ५०-७५ २५-५०	४ ३ २ १
३.	Organization and Methodology/ रचना व कार्यपध्दती No of Inspections of each sections carried out in the year (Inspection Reports)/ वर्षामध्ये पर्यवेक्षणाखालील कार्यासनांचे केलेले निरीक्षण (निरीक्षण अहवाल)	३ वेळा निरीक्षण अहवाल २ वेळा निरीक्षण अहवाल १ वेळा निरीक्षण अहवाल	३ २ १
४.	Capacity / क्षमता Has undergone all mandatory trainings (अनिवार्य प्रशिक्षण पूर्ण केले आहे काय)	होय	३

५.	Integrity/सचोटी		
	No misconduct in last financial year. (मागील आर्थिक वर्षी कोणतेही गैरवर्तन केलेले नाही)	होय	३
	२. Filing of Property returns (मत्ता व दायित्वे विवरणपत्रे मुदतीत सादर केली)	होय	२
६.	Total Period Spent in the Cadre except deputation period/प्रतिनियुक्ती वरील कालावधी वगळून संवर्गामध्ये व्यतित केलेला कालावधी.	१००% ७५% ५०%	३ २ १
७.	Average gradation of Confidential Report of last five financial year/ गोपनीय अहवालाची मागील पाच आर्थिक वर्षाची सरासरी प्रतवारी	A+ A B+	५ ३ १
	Objective Items / उद्दिष्टनिष्ठ बाबींचे एकूण कमाल गुण		६०
	(ब) Subjective Items /व्यक्तीनिष्ठ बाबी		
१.	Knowledge/ ज्ञान		
	Application of Rules, Orders/ लागू नियम व शासन आदेशांचा वापर	होय	४
	Changes made in the existing Rules/ Orders (प्रचलित नियम /शासन आदेशामध्ये बदल केले)	होय	४
२.	Communication Skills(संवाद कौशल्ये)		
	Drafting (मसुदा कौशल्य)	होय	४
	Presentation (सादरीकरण)	होय	४
३.	Sincerity in work (प्रामाणिकपणा)		
	Decision oriented(निर्णय देणारे)	होय	४
	Fairness/impartiality (नि:पक्षपातीपणा)	होय	४
४.	Innovation (नाविण्यपूर्ण)		
	Weeding out irrelevant processes/rules (अनावश्यक प्रक्रिया व नियम निरस्त करणे)	होय	४
	Use of ICT in day to day work i.e. use of e-office, online portals/दैनंदिन कामकाजामध्ये माहिती व तंत्रज्ञानाचा वापर	होय	४
५.	Extra Activities (इतर उपक्रम) Participation in Sports competitions, Participation in adventure activities, Performance in arts and culture, social activities, publication of literature /Research paper-thesis/ Article in well known news paper-magzine क्रिडा स्पर्धामध्ये सहभाग/धाडशी उपक्रमात सहभाग/कला-सांस्कृतिक कार्यक्रमात सहभाग/सामाजिक कार्य/ प्रकाशित साहित्य- संशोधनपर शोध निबंध/प्रबंध प्रकाशन/प्रसिध्द वर्तमानपत्र- नियतकालिकात छापलेले लेख इ.	सदर नमूद उपक्रमांपैकी एका उपक्रमात सहभागी झाले असल्यास एकपेक्षा जास्त उपक्रमात सहभागी झाले असल्यास	२ ४
६.	Collaboration within and outside the department (विभागातंर्गत व विभागाबाहेरील सहकार्य)	होय	४
	(ब) Subjective Items / व्यक्तीनिष्ठ बाबींचे एकूण कमाल गुण		४०
	उद्दिष्टनिष्ठ व व्यक्तीनिष्ठ बाबींचे मिळून (अ+ब) एकूण कमाल गुणांकन		१००

संवर्ग: कक्ष अधिकारी **एकूण गुण -१००**

अ.क्र.	Parameter/ निकष	Minimum Level /किमान स्तर	Marks/ गुण
	(अ) Objective Items /उद्दिष्टनिष्ठ बाबी		
१	Punctuality /वक्तशीरपणा		
	१. Punctuality regarding office working hours /कार्यालयीन वेळेनुसार येण्या-जाण्याबाबतचा वक्तशीरपणा	८५% ९०% ९५% १००%	१ २ ४ ५
	२.Leave trend (all types of leaves except C.L.) / रजेचा कल	२१ ते २५ दिवस १६ ते २० दिवस ११ ते १५ दिवस ६ ते १० दिवस १ ते ५ दिवस	१ २ ३ ४ ५
२	Disposal/ निपटारा		
	% of receipt cleared every month during the year/ वर्षामध्ये दरमहा निपटारा केलेल्या संदर्भाची टक्केवारी	८५% ९०% ९५% १००%	२ ४ ६ ८
	% of files disposed every month during year /वर्षामध्ये दरमहा निपटारा केलेल्या नस्तींची टक्केवारी	८५% ९०% ९५% १००%	२ ४ ६ ८
	Audit paras cleared during the year, Court Matters cleared during the year, Policy decision taken during the year/ वर्षामध्ये निपटारा केलेले लेखापरीक्षण परिच्छेद, वर्षभरात निपटारा केलेली न्यायालयीन प्रकरणे, वर्षभरात घेतलेले महत्वाचे शासन निर्णय	८५% ९० % ९५% १००%	२ ४ ६ ८
	percentage of RTI appeals against PIO / जनमाहिती अधिकारी यांच्याविरुध्द माहिती अधिकारांतर्गत होणारे अपील	कोणतेही अपील नाही २०% प्रकरणांत अपील ५०% प्रकरणांत अपील	३ २ १
	No. of legislative matters dealt during year such as Starred/Unstarred question, assurances, calling attention and other /(वर्षामध्ये विधानमंडळ विषयक प्रस्ताव/प्रश्न/आश्वासने/ लक्षवेधी व इतर)	१०० पेक्षा जास्त ७५ -१०० ५०-७५ २५-५०	४ ३ २ १
३.	Organization and Methodology/ रचना व कार्यपध्दती No of Inspections of each sections carried out in the year (Inspection Reports)/ वर्षामध्ये पर्यवेक्षणाखालील कार्यासनांचे केलेले निरीक्षण (निरीक्षण अहवाल)	३ वेळा निरीक्षण अहवाल २ वेळा निरीक्षण अहवाल १ वेळा निरीक्षण अहवाल	३ २ १
४.	Capacity / क्षमता		
	Has undergone all mandatory trainings (अनिवार्य प्रशिक्षण पूर्ण केले आहे काय)	होय	२
	Has cleared requisite departmental exams /	होय	२

	सदर संवर्गासाठीची विभागीय परीक्षा उत्तीर्ण आहे. सुट मिळाली असल्यास गुण नाही		
५.	Integrity/सचोटी		
	१. No misconduct in last financial year. (मागील आर्थिक वर्षी कोणतेही गैरवर्तन केलेले नाही)	होय	२
	२. Filing of Property returns (मत्ता व दायित्वे विवरणपत्रे मुदतीत सादर केली)	होय	२
६.	Total Period Spent in the Cadre except deputation period/प्रतिनियुक्ती वरील कालावधी वगळून संवर्गामध्ये व्यतित केलेला कालावधी.	१००% ७५% ५०%	३ २ १
७.	Average gradation of Confidential Report of last five financial year/ गोपनीय अहवालाची मागील पाच आर्थिक वर्षाची सरासरी प्रतवारी	A+ A B+	५ ३ १
	Objective Items / उद्दिष्टनिष्ठ बाबींचे एकूण कमाल गुण		**६०**
	(ब) Subjective Items /व्यक्तीनिष्ठ बाबी		
१.	Knowledge/ ज्ञान		
	Application of Rules, Orders/ लागू नियम व शासन आदेशांचा वापर	होय	४
	Changes made in the existing Rules/ Orders (प्रचलित नियम /शासन आदेशामध्ये बदल केले)	होय	४
२.	Communication Skills(संवाद कौशल्ये		
	Drafting (मसुदा कौशल्य)	होय	४
	Presentation (सादरीकरण)	होय	४
३.	Sincerity in work (प्रामाणिकपणा)		
	Decision oriented(निर्णय देणारे)	होय	४
	Fairness/impartiality (नि:पक्षपातीपणा)	होय	४
४.	Innovation (नाविण्यपूर्ण)		
